दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५१७ वा ● बुधवार, ता. ११ फेब्रुवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# सिंचनासाठी १५ हजार कोटींचे कर्ज

## 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाची घोषणा

**मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय : पुरंदर विमानतळाला गती**



**मुंबई । रयत समाचार**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सिंचन, आरोग्य, उद्योग, क्रीडा, शिक्षण, नगरविकास आणि प्रशासनाशी संबंधित विविध प्रकल्पांना या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**सिंचनासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज :** राज्यातील ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच १९३ प्रकल्पांच्या वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. यामुळे ८ लाख हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध होऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**कोल्हापुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम :** कोल्हापूर जिल्ह्यात मौजे विकासवाडी येथे १२ हेक्टर ७६ आर शासकीय जमीन क्रिकेट स्टेडियमसाठी उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यामुळे कोल्हापूरच्या क्रीडा विकासाला चालना मिळणार आहे.

**पुरंदर विमानतळासाठी विशेष प्राधिकरण स्थापन :** पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळ प्रकल्पाला गती देण्यासाठी विशेष हेतू प्राधिकरण स्थापन करण्यात येणार असून भूसंपादनासाठी ६ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास शासन हमी देणार आहे.

**'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियान राबविणार :** राज्यात गावपातळीवर आरोग्य सुधारणा घडवून आणण्यासाठी 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियान' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अभियानासाठी दरवर्षी ८० कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून ग्रामपंचायतींना ५ ते २ कोटी रुपयांपर्यंत पुरस्कार देण्यात येणार आहे.

**एमआयडीसीसाठी १००० एकर जमीन हस्तांतरण :** रत्नपुरी मळा (ता. इंदापूर) येथे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची १००० एकर जमीन नव्या औद्योगिक वसाहतीसाठी एमआयडीसीला हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे गुंतवणूक व रोजगार संधी वाढणार आहेत.

**मुंबईत टेनिस पायाभूत सुविधांना मंजुरी :** अंधेरीतील मौजे कोलेकल्याण येथे महाटेनिस फाऊंडेशनच्या माध्यमातून टेनिससाठी सुविधा उभारण्यात येणार असून म्हाडाच्या भूखंडांवर संयुक्त भागीदारीत विकास योजना राबविण्यात येणार आहे. **पीपीपी धोरण २०२६ जाहीर :** राज्यात सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण २०२६ जाहीर करण्यात आले. २५ कोटींपेक्षा अधिक मूल्य असलेल्या प्रकल्पांना मंजुरीचे अधिकार मुख्यमंत्री अध्यक्षतेखालील समितीला देण्यात आले आहेत.

**ई-मेलद्वारे नोटीस बजावणे कायदेशीर :** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमात सुधारणा करून ई-मेलद्वारे पाठवलेली नोटीसही कायदेशीर मानण्यात येणार आहे.

**प्रशासनात ११ अपर जिल्हाधिकारी पदांची निर्मिती :** राज्यातील वाढती लोकसंख्या व भौगोलिक विस्तार लक्षात घेता ११ अपर जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

**क्रीडा, शिक्षण व विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांमध्ये वाढ** राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यात आली असून बारामती जिल्हा क्रीडा संकुलासाठी ७५ कोटींच्या सुविधांना मंजुरी देण्यात आली.

**मंत्रिमंडळाचा विकासाचा झपाटा :** या निर्णयांमुळे राज्यातील सिंचन, आरोग्य, उद्योग, शिक्षण, क्रीडा व पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून महाराष्ट्र अधिक सक्षम व प्रगत होण्याच्या दिशेने वाटचाल करणार आहे.

# दादांची जागा कोणी घेऊ शकत नाही- सुनेत्रा पवार

## पहिल्या महिला उपमुख्यमंत्री; मंत्रालयात पदभार स्वीकारला



**मुंबई । रयत समाचार**

आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारत असताना विश्वासाची, कर्तव्याची आणि त्यागाची जाणीव सुद्धा आहे. मा. अजितदादांनी आयुष्यभर महाराष्ट्राच्या जनतेसाठी झटत विकासाचा जो ध्यास घेतला, तोच माझ्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन सुनेत्रा पवार यांनी आज ता.१० फेब्रुवार रोजी केले. त्यांनी आज उपमुख्यमंत्री पदाची सुत्रे हाती घेतली. यावेळी राष्ट्रवादीचे चाणक्य प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे आणि पार्थ पवार उपस्थित होते. महाराष्ट्राच्या राजकारणात आज ऐतिहासिक क्षण नोंदवला गेला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी) नेत्या आणि दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी मंगळवारी महाराष्ट्राच्या नव्या उपमुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. या नियुक्तीसह त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत.फ मुंबईतील मंत्रालयात त्यांनी आपल्या कार्यालयात प्रवेश करताच उपमुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला प्रणाम करून आदर व्यक्त केला. त्यानंतर त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या, दादांची कार्यशैली, निर्णयक्षमता आणि लोकांशी असलेले आत्मीय नाते, हेच बळ घेऊन मी पुढील वाटचाल करणार आहे. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांना पूर्णत्व देणे, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणे, हीच माझी प्राथमिकता असेल. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही; पण त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि अधिक सक्षम महाराष्ट्र घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नक्की करेन. या कठीण प्रसंगी जनतेने दिलेले प्रेम, आधार आणि विश्वास हेच माझे सामर्थ्य आहे. त्यांच्या स्मृतीपुढे आज मी एकच वचन देते की, महाराष्ट्राच्या हितासाठी निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करत राहीन, असेही सुनेत्रा पवार यांनी सांगितले. राज्यातील महिला नेतृत्वाच्या दृष्टीने हा क्षण अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. राजकीय वर्तुळात त्यांच्या नियुक्तीला मोठे महत्त्व दिले जात असून, आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या प्रशासनात नवा अध्याय चालू होईल.

# अजितदादांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' द्या- आ.काळे

## शिफारस करण्याची फडणवीसांकडे मागणी



**मुंबई । रयत समाचार**

विमान अपघातात मृत्यू झालेले उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी असलेला 'पद्मविभूषण' पुरस्कार देण्यात यावा, अशी मागणी कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आमदार काळे यांनी यासंदर्भात निवेदन सादर केले. राज्य सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस करावी, अशी विनंती त्यांनी केली. निवेदनात आमदार काळे म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकारणात चार दशकांहून अधिक काळ सक्रिय असणाऱ्या अजितदादांनी राजकीय, सामाजिक, शेती, सहकार, शिक्षण अशा विविध क्षेत्रांत मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. अजितदादांच्या कार्याचा उचित गौरव व्हावा आणि राज्यातील जनतेच्या भावना लक्षात घेता केंद्र शासनाने त्यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' देऊन सन्मानित करावे, अशी मागणी आमदार काळे यांनी केली.

# अजित पवारांचा अपघात की घात?

## आ. रोहित पवारांचा खळबळजनक दावा

**मुंबई । रयत समाचार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ता. २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. मात्र, आता या अपघाताबाबत त्यांचे पुतणे आमदार रोहित पवार यांनी अत्यंत खळबळजनक दावे करत घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. अजितदादांचा घातपात करण्यासाठी जाणीवपूर्वक व्यूहरचना आखली गेली होती का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी या प्रकरणाची आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आज मुंबईत घेतलेल्या सविस्तर पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी अपघातापूर्वीचा घटनाक्रम आणि तांत्रिक बाबींवर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले. रोहित पवार यांनी यावेळी इस्त्रायलची गुप्तचर संघटना मोसाद वर आधारित एका पुस्तकाचा दाखला दिला. एखाद्या नेत्याला संपवायचे असेल तर त्याच्या ड्रायव्हरला किंवा वैमानिकाला आपल्या बाजूने वळवा, असे तंत्र काही ठिकाणी वापरले जाते. अजितदादांच्या बाबतीत असाच काही प्रकार घडला आहे का? असा संशय त्यांनी व्यक्त केला. तसेच, दादांनी गेल्या काही दिवसांपासून प्लास्टिकऐवजी स्वतः च्या काचेच्या बाटलीतून पाणी पिण्यास सुरुवात केली होती, त्यांना काही कुणकुण लागली होती का? असाही प्रश्न त्यांनी विचारला. १३-१४ दिवस उलटूनही विमान कंपनीवर ठोस कारवाई झालेली नाही. या कंपनीच्या विमानांना युरोपमध्ये बंदी आहे, मग भारतात ती का सुरू आहेत? असा संताप रोहित पवारांनी व्यक्त केला. या प्रकरणाचा तपास केवळ स्थानिक संस्थांनीच नाही, तर फ्रान्स किंवा अमेरिकेच्या तपास संस्थांकडून करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.



**प्रवासाचे नियोजन जाणीवपूर्वक बदलले?**

**रोहित पवार यांच्या दाव्यानुसार, अजित पवार २७ जानेवारी रोजी संध्याकाळी मुंबईहून पुण्याला मोटारीने जाणार होते. त्यांचा ताफाही तयार होता. मात्र, ऐनवेळी त्यांना विलंब झाला.**

### विमान कंपनी आणि तांत्रिक त्रुटींवर गंभीर प्रश्न

**ज्या कंपनीच्या लेअरजेट विमानाने दादा प्रवास करत होते, त्याबाबत रोहित पवारांनी प्रमुख प्रश्न विचारले आहेत: विमानाचा ट्रान्सपाँडर का बंद होता? वैमानिकाने संकटकाळी दिला जाणारा मेडे कॉल का दिला नाही? फ्लाईट रडारचा डेटा अपघाताच्या एक मिनिट आधीच कसा काय बंद झाला? विमानाची स्टॉल वॉर्निंग सिस्टिम बंद होती का? विमानाचे दोन्ही पायलट ऐनवेळी का बदलण्यात आले? विमान उतरवताना व्हिजिबिलिटी कमी असतानाही रनवे ११ वरच उतरवण्याचा आग्रह का धरला गेला? शेवटची काही मिनिटे पायलट एक शब्दही का बोलला नाही? असा सवाल रोहित पवारांनी उपस्थित केला आहे.**

### विदर्भातील नेत्याची फाईल

**पूर्व विदर्भातील एका बड्या नेत्याच्या फाईलवर सही करण्यासाठी दादांना ताटकळत ठेवण्यात आले. ती फाईल मंत्रालयात असल्याने वेळ गेला.**

### नियोजित बैठक

**एका बड्या राजकीय नेत्याने भेटीसाठी उशीर केल्यामुळे दादांना रस्ते प्रवास रद्द करून दुसऱ्या दिवशी सकाळी विमानाने जाण्याचा निर्णय घ्यावा लागला.**





# देशप्रेमी भारतीयांसमोर पेट्रोलडिझेल दरवाढीचे संकट?

## ट्रम्पच्या भूमिकेमुळे ट्रेड डीलवर प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारत आणि अमेरिका यांच्यात झालेल्या बहुचर्चित ट्रेड डीलमुळे दोन्ही देशांमधील आर्थिक संबंध अधिक मजबूत होतील, असा अंदाज व्यक्त केला जात असतानाच आता या करारासोबत जोडलेल्या एका अटीमुळे भारतासमोर नवे आव्हान उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जगभर एप्स्टीन फाईलने धुमाकुळ घातला असताना भारतावर हे संकट आत्ताच का आले, ही विचार करायला लावणारी दुर्दैवी घटना आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रेड डीलनंतर भारतावर लावण्यात आलेल्या टॅरिफमध्ये काही प्रमाणात कपात केली आहे. यापूर्वी भारतीय वस्तूंवर अमेरिकेत ५० टक्के टॅरिफ आकारला जात होता. त्यामध्ये ७ टक्क्यांची कपात करण्यात आली असून आता भारतावर ४३ टक्के टॅरिफ लागू राहणार आहे. मात्र या करारामागे अमेरिकेने भारतासमोर एक महत्त्वाची अट ठेवली असल्याचे समोर येत आहे.

**'रशियन तेल खरेदी थांबवा' अमेरिकेचा दबाव :** ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणानुसार भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी बंद करावी, अशी अट पुढे करण्यात आली आहे. तसेच त्याऐवजी भारताने अमेरिकेकडून आणि व्हेनेझुएलाकडून तेल आयात वाढवावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. जर भारताने ही अट मान्य केली नाही, तर पुन्हा टॅरिफ वाढवण्याचा इशारा अमेरिकेकडून देण्यात आला आहे.

**भारताच्या इंधन दरांवर परिणाम होणार? :** भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के तेल आयातीवर अवलंबून आहे. गेल्या काही काळात रशिया हा भारताचा सर्वात मोठा तेल पुरवठादार ठरला आहे. विशेष म्हणजे रशियाकडून भारताला मोठ्या प्रमाणात सवलतीत तेल मिळत आहे. नुकतीच प्रति बॅरल ११ डॉलरपर्यंत सूट देण्यात आल्याची माहिती आहे. परंतु जर भारताने अमेरिकेच्या अटीप्रमाणे रशियन तेलाऐवजी अमेरिकन तेलाची खरेदी सुरू केली, तर प्रति बॅरल सुमारे ७ डॉलर अतिरिक्त खर्च येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचा थेट परिणाम देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या दरांवर होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त होत आहे.

**निर्णय भारतासाठी कठीण :** रशियन तेलाची गुणवत्ता आणि किंमत दोन्ही बाबतीत भारताला फायदा होत असताना अमेरिकेच्या दबावामुळे भारतासमोर आर्थिक आणि राजनैतिक संतुलन राखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. आता भारत सरकार यावर कोणता निर्णय घेणार, याकडे देशासह जागतिक बाजाराचेही लक्ष लागले आहे.



# सावित्रीबाई फुले विद्यापीठ 'जीवनसाधना गौरव' पुरस्काराने कै. आप्पासाहेब राजळेंच्या समाजकार्याचा सन्मान

## आ. मोनिका राजळेंनी पुरस्कार स्वीकारला

**पुणे । रयत समाचार**

सहकार, जलसिंचन, शिक्षण आणि ग्रामीण विकास क्षेत्रात आयुष्यभर निः स्वार्थ योगदान देणारे माजी आमदार आप्पासाहेब राजळे (काका) यांच्या कार्याची दखल घेत सावित्रीबाई फ ुले पुणे विद्यापीठाच्या वतीने जाहीर करण्यात आलेला प्रतिष्ठेचा 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' त्यांच्या वतीने आमदार मोनिका राजळे यांनी स्वीकारला. या प्रसंगी राजळे कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती आ. मोनिका राजळे यांनी दिली.

आ. राजळे पुढे म्हणाल्या, पाथर्डीसारख्या दुष्काळी तालुक्यात आप्पासाहेबांनी श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सहकाराचे भक्कम जाळे उभे केले. सहकाराबरोबरच जलसिंचन, दुग्ध व्यवसाय आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान समाजविकासाला दिशा देणारे ठरले आहे. या समर्पित लोककल्याणकारी कार्याची दखल म्हणून विद्यापीठाने त्यांना हा सन्मान प्रदान केला.

कार्यक्रमात ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी गौरवोद्गार काढताना सांगितले, संयम, संस्कार आणि सहकार्य यांचा सुंदर संग्रह म्हणजे आप्पासाहेब. त्यांनी सहकाराला केवळ आर्थिक चळवळ न ठेवता माणसांना जोडणारी चळवळ घडवली. संस्था उभ्या करण्यापेक्षा माणसं घडवणं हेच खरं नेतृत्व आहे. या पुरस्काराबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर तसेच डॉ. माशेलकर यांचे राजळे कुटुंबीयांच्या वतीने आणि शेवगाव-पाथर्डीतील जनतेच्या वतीने आ. मोनिका राजळे यांनी आभार मानले.

# नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करा- महापौर गाडे

## महापौर, उपमहापौर यांची मनपा अधिकाऱ्यांसमवेत बैठक

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेच्या नूतन महापौर ज्योती गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी मनपा अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक घेऊन शहरातील प्रलंबित प्रश्न, विकासकामे व नागरिकांच्या तक्रारींच्या निराकरणाचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीत महापौरांनी नागरिकांशी संबंधित कामे प्राधान्याने सोडवण्याच्या सूचना केल्या. महापौर गाडे म्हणाल्या, महापालिकेबद्दल नगरकरांमध्ये समाधान निर्माण व्हावे यासाठी दैनंदिन तक्रारींचे तातडीने निराकरण झाले पाहिजे. नागरिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष केल्यास प्रशासनावरील विश्वास कमी होतो. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून निधी मिळवण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी सविस्तर अहवाल सादर करत शासन निधीतून २४ रस्त्यांची कामे सुरू असून त्यापैकी १४ पूर्ण झाल्याची माहिती दिली. शासनाकडून ४४ कोटी रुपये अनुदान मिळाले असून मनपाने १५ कोटी रुपये स्वतःच्या निधीतून खर्च केले आहेत. नेहरू मार्केट प्रकल्पासाठी वर्क ऑर्डर देण्यात आली असून ६० दुकाने उभारली जाणार आहेत. सर्जेपुरा रंगभवन परिसरातील पार्किंग व सांस्कृतिक भवन, दोन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, जिजामाता हॉस्पिटल, नाट्यगृह सजावट, ई-बस डेपो आदी कामे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अपूर्ण प्रकल्पांसाठी निधीची गरज असून वसुली वाढवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. बैठकीस अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, नगरसेवक सागर मुर्तडकर, नगरसचिव मेहर लहारे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, शहर अभियंता मनोज पारखे, नगर रचनाकार यादव, वैभव जोशी, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, गणेश गाडळकर, आदित्य बल्लाळ, प्रभागाधिकारी तडवी, बाळासाहेब पवार, शंकर मिसाळ, अशोक साबळे, राकेश कोतकर आदी उपस्थित होते.



### नियम न पाळल्यास कारवाई

**सर्व कर्मचारी शासकीय वेळेनुसार कामकाज सुरू करावे, दुपारच्या विश्रांतीनंतर वेळेवर हजर राहावे व निर्धारित वेळेपूर्वी सुट्टी घेऊ नये, अन्यथा कारवाई केली जाईल. युनिफॉर्म असलेल्या कर्मचाऱ्यांनी तो नियमित परिधान करावा, कार्यालय व प्रभाग स्वच्छ ठेवावेत, नेहरू पुतळा परिसरातील जागेचा प्रश्न सोडवावा, कापड बाजारात महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था करावी व पार्किंगसाठी योजना आखावी.**

**ॲड. धनंजय जाधव**, उपमहापौर

**उपायुक्त, ऑडिटर, कॅफो व शहर अभियंता आदी महत्त्वाची पदे रिक्त असल्याने कर्मचाऱ्यांवर ताण येत असून ही पदे भरण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल. तसेच जन्ममृत्यू दाखले डिजिटल करण्याची प्रक्रिया, ऊर्जा बचत उपाययोजना, आरोग्य सुविधा बळकटीकरण, बांधकाम परवान्यांची ऑनलाइन प्रक्रिया, बंद उद्याने सुरू करणे व पाणीपुरवठ्याचे नियोजन यावर काम करावे.**

**ज्योती अमोल गाडे**, महापौर

# स्थायी व महिला बालकल्याण समितीत प्रत्येकी १६ सदस्य

## पक्षीय संख्याबळानुसार जागावाटप निश्चित

**अहमदनगर । रयत समाचार**

महापौर व उपमहापौर निवडणुकीनंतर आता अहिल्यानगर महानगरपालिकेत स्थायी समिती तसेच महिला व बालकल्याण समिती सदस्यांची नियुक्ती विशेष सभेत करण्यात येणार आहे. दोन्ही समित्यांमध्ये प्रत्येकी १६ सदस्य नियुक्त केले जाणार असून, राजकीय पक्षांच्या संख्याबळानुसार समित्यांतील सदस्यसंख्या निश्चित करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या विशेष सभेत संबंधित पक्षांच्या गटनेत्यांकडून सदस्यांची नावे सुचवली जाणार असून त्यानुसार नियुक्त्या केल्या जातील, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. महानगरपालिकेतील पक्षीय संख्याबळ महानगरपालिकेत सध्या विविध पक्षांचे सदस्यसंख्याबळ पुढीलप्रमाणे आहे

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) २७, भारतीय जनता पक्ष २५


शिवसेना १०, काँग्रेस २, एमआयएम २, बसपा १, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) १, या संख्याबळाच्या आधारे स्थायी समितीत जागावाटप पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस ६ सदस्य, भाजप ६ सदस्य, शिवसेना २ सदस्य

काँग्रेस १ सदस्य, एमआयएम १ सदस्य.

महिला व बालकल्याण समितीतही हेच प्रमाण लागू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सभापती निवडीसाठी पुढील प्रक्रिया समिती सदस्यांच्या निवडी झाल्यानंतर स्थायी समिती सभापती तसेच महिला व बालकल्याण समितीचे सभापती व उपसभापती निवडण्यासाठी निवडणुकीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठवला जाणार आहे. विभागीय आयुक्तांकडून सभेची तारीख जाहीर झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रम घोषित होऊन निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचेही आयुक्त डांगे यांनी सांगितले.



# माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. जाकीर हुसेन यांना अभिवादन

**अहमदनगर । आबीद खान**

माजी राष्ट्रपती तथा भारतरत्न डॉ. जाकीर हुसेन यांच्या जयंतीनिमित्त मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

सर्जेपुरा येथील मनपाच्या शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १३ येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रउभारणीतील कार्याला उजाळा देण्यात आला. भारताच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत ज्यांचे कार्य काळाच्या पलीकडे जाऊन समाजाला प्रेरणा देत राहते. डॉ. जाकीर हुसेन हे असेच महान व्यक्तिमत्त्व असून त्यांनी शिक्षण, संस्कृती व राष्ट्रीय एकात्मतेसाठी आयुष्यभर कार्य केले, असे प्रतिपादन मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान यांनी केले. ''शिक्षण हे केवळ ज्ञान देण्यासाठी नसून माणूस घडवण्यासाठी असते,'' हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान मुलांना स्वच्छतेचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले. यावेळी अध्यक्ष आबीद दुलेखान, शिक्षिका जबीन इनामदार, समीना खान आदी उपस्थित होते.

# अजित पवार यांच्या निधनाने राज्याची अपरिमित हानी

**पाथर्डी । रयत समाचार**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने राज्याच्या सार्वजनिक जीवनाची अपरिमित हानी झाली असून सर्वसामान्यांचा कळवळा असलेले नेतृत्व हरपल्याची भावना सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. संवेदनशील, हळवे आणि तितकेच कणखर नेतृत्व म्हणून दादांची प्रतिमा समाजमनातून कधीही पुसली जाणार नाही, असेही यावेळी नमूद करण्यात आले. आगामी काळात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मागे कार्यकर्त्यांनी एकजूट उभी करून वाटचाल करावी, असे आवाहनही करण्यात आले. लोकनेते आप्पासाहेब राजळे मंगल कार्यालयात सोमवारी सकाळी आयोजित सर्वपक्षीय शोकसभेत विविध मान्यवरांनी दादांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी आमदार मोनिका राजळे, राष्ट्रवादीचे नेते ॲड. प्रताप ढाकणे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, योगेश रासने, हुमायून आतार, धनंजय बडे, महेश अंगरखे, बाजार समितीचे सभापती ॲड. सुभाष बर्डे, बाबा राजगुरू, श्री त्रिलोक ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, ऊसतोडणी कामगार संघटनेचे गहिनीनाथ थोरे, उमेश मोरगावकर, राजेंद्र देवढे, प्रा. रमेश मोरगावकर, नासिर शेख, भगवान बांगर, भगवान आव्हाड, अंकुश चितळे, भगवान दराडे, ज्येष्ठ नेते अशोक चोरमले, उद्धव वाघ आदींनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला. कोणताही कार्यकर्ता एका रात्रीत घडत नाही; अनेक वर्षांच्या झिजेतून नेता तयार होतो. अशा नेतृत्वाच्या अकाली जाण्याने एका पिढीचे नुकसान होते, असे वक्त्यांनी सांगितले. अजितदादा कर्मयोगी नेते होते. पक्षभेद बाजूला ठेवून सहवासातील प्रत्येकाशी त्यांनी आपुलकीने वागणूक दिली. अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी त्यांच्यातील 'माणूसपण' जपले, हेच त्यांच्या कार्याचे यश असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तालुक्याच्या विकासासाठी पवार कुटुंबाचे मोठे योगदान असल्याची जाणीव सर्वांना आहे. वेळेचे काटेकोर पालन, नियोजनबद्ध कामकाज, प्रचंड कार्यतत्परता आणि शिस्तप्रिय स्वभाव यामुळे दादांनी सार्वजनिक जीवनात आदर्श निर्माण केला. साहित्य, कला, संस्कृती आणि लोकपरंपरांनाही त्यांनी समान न्याय दिला. मूलभूत सुविधांच्या उभारणीसाठी तालुक्याला मोठा निधी उपलब्ध करून दिल्याची आठवणही यावेळी करण्यात आली. उत्तम वक्ते, कुशल प्रशासक आणि स्पष्टवक्ते अशी दादांची ओळख होती. राज्याच्या कानाकोपऱ्याचा अभ्यास, बदलत्या राजकीय परिस्थितीवर बारकाईने लक्ष आणि स्वच्छतेबाबत तडजोड न करण्याची भूमिका यामुळे त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. मंत्रालय असो वा विधिमंडळ, त्यांची उपस्थिती नेहमीच लक्षणीय राहिली. पक्षबांधणीसाठी त्यांनी विशेष वेळ दिला, असेही वक्त्यांनी नमूद केले. स्मरणशक्ती आणि तारतम्य बुद्धीचे वरदान लाभलेल्या दादांना सहवासातील प्रत्येक व्यक्ती लक्षात राहायची. राजकीय विरोधकांविषयीही कोणताही पूर्वग्रह न बाळगता त्यांनी आपुलकीने मार्गदर्शन केले. दादांचे विचार, कार्यपद्धती आणि प्रचंड मेहनतीची तयारी हे गुण नव्या पिढीने आत्मसात करावेत; हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. राजीव सुरवसे यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत सभेचे औचित्य संतुलित ठेवले. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



### सर्वपक्षीय शोकसभेत श्रद्धांजली



# अहमदनगर महाविद्यालयाचे एनएसएस शिबिर उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

भा. पां. हिवाळे शिक्षण संस्थेचे अहमदनगर महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ससेवाडी येथे ता. १६ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित विशेष हिवाळी निवासी शिबिराचा समारोप संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या प्रेरणेने व प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला. सात दिवसांच्या शिबिरादरम्यान स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान, श्रमदान, सीना नदी उगम परिसर स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण जनजागृती, व्यसनमुक्ती तसेच सामाजिक प्रबोधनात्मक उपक्रम राबविले. समारोप कार्यक्रमास ससेवाडीच्या सरपंच रोहिणी आठरे, उपसरपंच अश्विनी बळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तसेच डॉ. सय्यद रझाक, उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. प्रितमकुमार बेदरकर, प्रबंधक कल्पलता भिंगारदिवे, डॉ. प्रसाद लामरूड व डॉ. गोकुळ गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमासाठी ग्रामस्थ डॉ. वसंत आठरे, शंकर बळे, विष्णू जरे, अर्चना ससे, संकेत जरे, भाग्यश्री ससे, विजय जरे, अशोक काळे आदींचे सहकार्य लाभले. शिबिर कार्यक्रम अधिकारी डॉ. रविकिरण लाटे व प्रा. सय्यद झरीना यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. कार्यक्रमाचे समालोचन प्रा. अभिषेक सांगळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. सीमा तिकोने यांनी केले.



# नित्यसेवा सोसायटीतील विहिरीत मासे मृतावस्थेत

**अहमदनगर । विजय मते**

वसंत टेकडी येथील नित्यसेवा सोसायटीमधील विहिरीत मासे मृतावस्थेत आढळून येत असल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. विडी कामगारांची सोसायटी म्हणून ओळख असलेल्या नित्यसेवा सोसायटीतील ही विहीर असून नगरपालिकेची पाणी व्यवस्था नसताना पूर्वी परिसरातील नागरिक या विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरत होते. सध्या प्रत्येकाच्या दारात नळ योजना उपलब्ध झाल्याने पिण्याचे पाणी मुबलक असून या विहिरीचा वापर सांडपाणीसाठी होत असल्याची माहिती मिळाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुमारे २०० ते ३०० मासे मृतावस्थेत आढळून येत असल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. स्थानिक तरुणांनी मृत मासे बाहेर काढून स्वच्छता करण्याचा प्रयत्न केला असतानाही आज सकाळी पुन्हा मासे मृतावस्थेत आढळून आले. पाण्याची तपासणी करण्यासाठी नमुना प्रयोगशाळेत पाठविण्यात आला असून अहवाल येण्यासाठी सुमारे पंधरा दिवस लागणार आहेत. तोपर्यंत विहिरीचे पाणी कुणीही वापरू नये, असा संदेश तरुणांनी सोसायटीतील नागरिकांना दिला आहे. अहवाल आल्यानंतर माशांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे स्पष्ट होणार आहे.

रयत समाचार Classified
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com** , **उपसंपादक : दिपक शिरसाठ**, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा**, 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक**, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)


# जमीन महसूल वसुलीसह फेरफार प्रकरणांचा तातडीने निपटारा करा- जिल्हाधिकारी डॉ. आशिया

## विकासकामांची केली पाहणी

**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील जमीन महसूल वसुलीचे उद्दिष्ट तातडीने पूर्ण करत फेरफारच्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. अहिल्यानगर तहसील कार्यालयात आयोजित तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया मार्गदर्शन करत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले , प्रलंबित प्रकरणांमुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी वेळबद्ध कार्यवाही करण्यात यावी. फेरफार प्रकरणे मंजूर करताना नियम व कार्यपद्धतींचे काटेकोर पालन करून पारदर्शक व लोकाभिमुख कामे करण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. बैठकीनंतर जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी तालुक्यातील विविध विकासकामांना भेटी दिल्या.

मौजे पिंपळगाव उज्जैनी येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या शासकीय जागेवर १२ लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक लाभार्थ्याला ५०० चौरस फूट जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, घरकुल बांधकाम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच डीसीएस प्रकल्पांतर्गत रोहिदास गंगाधर वाघ व चंद्रकला कानिफ वाघ या शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली.



मांजरसुंबा येथील गांडूळखत प्रकल्प व गोशाळेस जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थापनाची माहिती घेतली. पशुधनाचे आरोग्य, चारा व्यवस्थापन, स्वच्छता व गोसंवर्धनाच्या उपाययोजनांचा आढावा घेत त्यांनी गोशाळा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले. तसेच स्वच्छ सुंदर माझा गाव उपक्रमांतर्गत गावभेट देऊन त्यांनी स्वच्छता मोहिमेची पाहणी केली. गावातील स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची निगा, सांडपाणी व्यवस्थापन व नागरिकांचा सहभाग याबाबत त्यांनी समाधान व्यक्त करत स्वच्छता अभियान सातत्याने राबविण्याचे निर्देश दिले.

# मांजरसुंबा येथे जिल्हाधिकाऱ्यांकडून विकासकामांची पाहणी

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा आढावा



**नगर तालुका । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत मांजरसुंबा गावाला जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या नेतृत्वाखाली उच्चस्तरीय पाहणी भेट देण्यात आली. सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, प्रांत अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, गटविकास अधिकारी राजेंद्र देसले, सहाय्यक गटविकास अधिकारी सारंग दुगल, विस्तार अधिकारी दळवी यांनी गावाला भेट देत स्वच्छता, सुशासन, कृषी यांत्रिकीकरण, पर्यावरण संवर्धन आदी क्षेत्रांतील कामांची सखोल पाहणी केली. कृषी विभागामार्फत यांत्रिकीकरण अंतर्गत ट्रॅक्टर पूजनही करण्यात आले. अधिकाऱ्यांनी गावातील परसबाग, स्वच्छ गोठा व प्राथमिक शाळेला भेट देऊन झालेल्या विकासकामांचे कौतुक केले.

**कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गावातील महिलांना कचरा कुंडी वाटप करण्यात आले तसेच वृक्षलागवड करण्यात आली. याशिवाय अधिकाऱ्यांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता अभियान राबविले.**

यावेळी मांजरसुंबा ग्रामपंचायतीच्या सरपंच रूपाली कदम, उपसरपंच जालिंदर कदम, संतोष पटारे, सारिका वाळुंज, सुविधा वाणी, मंगल कदम, शरद धलपे, मनीषा वडे, अनिता जाधव, रोहिणी कदम, मीनाक्षी कदम, ज्योती वाघमारे, भीमा कदम, संदीप वाघमारे, छाया कदम, लंका वरखडे, सुनीता कदम, जयश्री वाघमारे आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांमुळे मांजरसुंबा गाव आदर्श ग्राम बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगत अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना सक्रिय सहभागाचे आवाहन केले.

# आरोग्य जनसंवादानंतर प्रशासनाची तत्काळ दखल;आरोग्यकेंद्रांत बैठका

## स्वच्छता, सुविधा सुधारण्याचे आदेश

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

येथील जिजाई लॉन्स येथे ता. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी इकोनेट, पुणे संस्थेच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रम मोठ्या उत्साहात व नागरिकांच्या व्यापक सहभागात पार पडला. कार्यक्रमास तहसील कार्यालय तसेच पंचायत समिती श्रीगोंदा येथील सहाय्यक गट विकास अधिकारी रणजित अकुलवार, कक्ष अधिकारी महेश थोरात तसेच आरोग्य विभागातील विविध अधिकारी उपस्थित होते.फ या जनसंवादात प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमधील शासकीय आरोग्य योजना, उपलब्ध मूलभूत सुविधा तसेच अंमलबजावणीदरम्यान नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा झाली. नागरिकांनी मांडलेल्या समस्यांची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली. कार्यक्रमानंतर प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच पंचायत समितीतील आरोग्य विभागात स्वतंत्र बैठका घेण्यात आल्या.



आरोग्य सुविधा सुधारणा, स्वच्छता, सेवा सुलभता व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर चर्चा झाली असून सर्व आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छतेबाबत स्पष्ट व कठोर आदेश देण्यात आले. या प्रक्रियेसाठी कक्ष अधिकारी महेश थोरात यांनी विशेष पुढाकार घेत प्रशासन, आरोग्य यंत्रणा व लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधत कार्यवाही राबवली. या सकारात्मक भूमिकेबद्दल इकोनेट संस्थेच्या वतीने पंचायत समिती श्रीगोंदा येथे उपस्थित अधिकारी वर्गाचा महात्मा ज्योतिराव फुले लिखित 'गुलामगिरी' हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संदीप आल्हाट व महेंद्र शिंदे यांचाही सन्मान झाला. आरोग्य हा केवळ शासकीय विभागाचा विषय नसून समाजाच्या सहभागातूनच सक्षम होतो, हे या जनसंवादातून अधोरेखित झाले असून समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल कक्ष अधिकारी महेश थोरात यांचे सकल हक्कधारकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# शिवसेना गटनेतेपदी श्रीकृष्ण धुमाळ यांची निवड



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा नगरपरिषदेतील शिवसेना (शिंदे गट) नगरसेवकांची दीड महिना लांबलेली संयुक्त गट नोंदणी प्रक्रिया अखेर पूर्ण झाली. या संदर्भात मंगळवार ता. १० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी पंकज अशिया यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, अहमदनगर शहरप्रमुख संभाजी कदम तसेच प्रवक्ते संजीव भोर यांच्या आदेशानुसार उपजिल्हा प्रमुख व श्रीगोंदा शिवसेना पक्षाच्या नगरपालिका निवडणूक पॅनल प्रमुख मनोहर पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली गटनोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. तालुक्यातील विकासकामे प्रभावीपणे राबवणे व संघटनात्मक बळकटी साधणे हा संयुक्त गट रचनेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले. गटनेतेपदी श्रीकृष्ण धुमाळ, उपगटनेतेपदी सुशीलकुमार शिंदे, सचिवपदी ऋषिकेश बोरुडे तसेच खजिनदारपदी दिपाली बोरुडे यांची एकमताने निवड करण्यात आली. आगामी काळात पक्षसंघटन मजबूत करत तालुक्यातील जनतेच्या प्रश्नांसाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# हिंगोणी ते हनुमानवाडी चौफुली रस्त्याचे काम निकृष्ट

## वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनईवरून नेवासा, खरवंडी, वडाळा, कांगोणी आदी गावांकडे जाण्यासाठी हिंगोणी ते हनुमानवाडी चौफुली हा रस्ता जवळचा व सोपा मार्ग असून प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून सूचित करण्यात आलेला आहे. या रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. अनेक वर्षांच्या मागणीनंतर रस्त्याचे काम सुरू झाले असले तरी सध्या सुरू असलेल्या कामातील अनियमितता, निकृष्ट दर्जा तसेच अरुंद रस्त्याबाबत तक्रारी वाढू लागल्या आहेत. काम पूर्ण झाल्यानंतरही वाहतुकीमुळे रस्ता लवकरच उखडण्याची शक्यता असल्याने हा रस्ता टिकणार कसा, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सुरू असलेले काम निकृष्ट दर्जाचे होताना दिसत आहे. सोनई बाजारपेठ असल्याने अनेक गावांना जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग व्यापारी व नागरिकांसाठी अत्यंत आवश्यक आहे. काही महिन्यांपासून काम सुरू असताना रस्त्याच्या बाजूला गटारे व साईड पट्ट्या न करता कामकाज सुरू असल्याने हिंगोणी-सोनई परिसरातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी कामाची पाहणी करून आवश्यक कारवाई करावी व नागरिकांना सुरक्षित व सुलभ वाहतूक मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी रहिवाशांनी केली आहे.

# नागापूर ते सावली हॉटेल रस्तादुरुस्ती रखडली

## १७ फेब्रुवारीला शिवसेनेचा उपोषणाचा इशारा

**नगर तालुका । रयत समाचार**

नागापूर चौक ते सावली हॉटेल दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाला गती देऊन तात्काळ डांबरीकरण पूर्ण करावे, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा शिवसेनेचे डॉ. दिलीप पवार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

याबाबत एमआयडीसीचे अभियंता संदीप बडगे यांना निवेदन देण्यात आले. सध्या केवळ दुभाजकाचे काम पूर्ण झाले असून लाईट पोल बसविण्याचे काम बाकी आहे. त्यामुळे डांबरीकरणास विलंब होत असल्याचे सांगण्यात आले. नागरिकांच्या समस्या व जनभावना लक्षात घेऊन हे काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसांत डांबरीकरण पूर्ण न झाल्यास १७ फेब्रुवारी रोजी संबंधित अधिकाऱ्यांच्या दालनात उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती उद्योगमंत्री, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनाही पाठविल्या असून त्यावर बाळासाहेब कोतकर, महेश म्हस्के, शिवाजी दिवटे यांच्या सह्या आहेत.



**सदर रस्त्याचे काम मागील तीन ते चार महिन्यांपासून सुरू असून अत्यंत संथ गतीने सुरू आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. दररोज हजारो वाहनांची या मार्गावरून ये-जा होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.**

# शिरसाटवाडी ग्रामस्थांना सुसज्ज रस्ता देण्यासाठी प्रयत्नशील- पालवे



**पाथर्डी । नितीन गटाणी**

तालुक्यातील शिरसाटवाडी गावाचा मुख्य रस्ता अत्यंत खराब झाला असून रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. फाटा ते गाव रस्त्यासाठी ग्रामविकास खात्याशी पत्रव्यवहार करण्यात आला असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या संदर्भात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना पत्र दिल्याची माहिती मनसे जिल्हाध्यक्ष तथा सरपंच अविनाश पालवे यांनी दिली. या रस्त्यासाठी लवकरच निधी उपलब्ध करून काम हाती घेतले जाईल, असे त्यांनी सांगितले. शिरसाटवाडी ग्रामपंचायतीची स्थापना १९८७ साली झाली. पालवे सरपंच झाल्यानंतर गावात रस्ते, लाईट, भूमिगत गटारे, स्ट्रीट लाईट, सिंगल फेज, पूल, सभामंडप, वीज ट्रान्सफॉर्मर आदी विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मात्र जिल्हा परिषद मालकीचा व ग्रामपंचायतीच्या आवाक्याबाहेर असलेला फाटा ते गाव हा मुख्य रस्ता करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आवश्यक असून पुढील काही महिन्यांत निधी मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पालवे यांनी स्पष्ट केले. ग्रामस्थांना सुसज्ज रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा शेतकरी जनजागृती व क्रेडिट आउटरीच कार्यक्रम

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव तालुक्यासह परिसरातील शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक व उपयुक्त असा शेतकरी जनजागृती व क्रेडिट आउटरीच कार्यक्रम सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना थेट बँकिंग सेवा, कृषी कर्ज व विविध सरकारी योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, ता. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, आखेगाव रोड, शेवगाव येथे होणार आहे. कार्यक्रमामध्ये कृषी कर्ज, पीक कर्ज, किसान क्रेडिट कार्ड (KCC), पशुसंवर्धन, शेळीपालन, कुक्कुटपालन, अन्नप्रक्रिया उद्योग, ग्रामीण आजीविका योजना तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञान याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना बँकेमार्फत उपलब्ध विविध योजनांची माहिती, कर्ज मंजुरी प्रक्रिया, अर्ज पद्धत व आवश्यक कागदपत्रांबाबत तज्ज्ञ बँक अधिकारी प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक प्रमुख निकुंज गर्ग, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष नवले तसेच बँकेचे वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. शेवगाव तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन बँकिंग व कृषी योजनांची माहिती मिळवावी व कर्ज सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.



# घरपट्टी, नळपट्टीसाठी ऑनलाइन भरणा सुविधा सुरू करण्याची मागणी

**पाथर्डी । रयत समाचार**

पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना घरपट्टी व नळपट्टी भरण्यासाठी अद्याप प्रत्यक्ष नगरपरिषद कार्यालयात जावे लागत असल्याने वेळेचा अपव्यय, गर्दी आणि गैरसोय होत असल्याची बाब समोर आली आहे. ही अडचण दूर करण्यासाठी करांचा भरणा ऑनलाइन / नेट बँकिंग, यूपीआय, क्यूआर कोड तसेच डेबिट-क्रेडिट कार्डद्वारे करण्याची सुविधा सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे गटनेते देवा पवार व नगरसेविका मंगल सोनटक्के यांनी निवेदनाद्वारे नगरपरिषद प्रशासनाकडे केली.

निवेदनात म्हटले आहे की, डिजिटल युगात बहुतांश व्यवहार ऑनलाइन पद्धतीने होत असताना नगरपरिषदेचे करसंकलन अद्याप पारंपरिक पद्धतीवर अवलंबून असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ऑनलाइन करभरणा सुविधा उपलब्ध झाल्यास नागरिकांचा वेळ वाचेल, कार्यालयातील गर्दी कमी होईल आणि करसंकलन प्रक्रिया अधिक पारदर्शक, जलद व कार्यक्षम होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासनाने तातडीने आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून ऑनलाइन करभरणा प्रणाली कार्यान्वित करावी आणि या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहून लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. या संयुक्त निवेदनावर गटनेते देवा पवार, नगरसेविका मंगल सोनटक्के, सविता भापकर व रेखा हंडाळ यांच्या सह्या आहेत.

# डेज मुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरे करण्याचे. त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोझ डे पासून सुरू झालेला डेजचा हा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, टेडी डे, प्रॉमिस डे, चॉकलेट डे, टेडी डे, हग डे, किस डे असे विविध प्रकाराचे डे येतात. डेजचा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्या आवडत्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाच्या फुलाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण आलेले असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेजच्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त का लागतो? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील स्मितहास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त असावा असे काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते आपल्या आवडत्या व्यक्तीवर प्रेम करण्यासाठी, आपल्या आवडत्या व्यक्तीला भेटवस्तू वस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डेची गरज नसते. बरे हे डेज पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात डेजचे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, ब्रदर डे, सिस्टर डे, डॉक्टर्स डे, वकील डे, इंजिनियर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अती झाले नि हसू आले अशी गत या डेजची झाली आहे. सोशल मिडीयावर ॲक्टिव्ह राहणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांच्या पोस्टवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडत असतो. वर्षभर कधी आई वडिलांप्रती प्रेम, आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप ॲक्टिव्ह असतात. जन्मदात्या आई वडिलांसाठी, त्यांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डेची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमुल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेजची आवश्यकता आहे का? असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद



# बास डे लीडेची अष्टपैलू कामगिरी

## नेदरलँड्सचा नामिबियावर दमदार विजय

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**


दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मधील दहाव्या सामन्यात नेदरलँड्सने नामिबियावर ७ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. बास डे लीडेच्या अष्टपैलू कामगिरीमुळे हा सामना पूर्णतः नेदरलँड्सच्या बाजूने झुकला. नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारलेल्या नेदरलँड्सच्या भेदक माऱ्यासमोर नामिबियाचा डाव २० षटकांत ८ गडी गमावून १५६ धावांवर आटोपला. जॅन निकोल लॉफ्टी ईटनने ४२ धावांची संयमी खेळी करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला, तर जॅन फ्रायलिंकने ३० आणि जोनाथन स्मिटने २२ धावा केल्या. नेदरलँड्सकडून बास डे लीडे आणि लॉगन व्हॅन बीक यांनी प्रत्येकी २ बळी घेत प्रभावी गोलंदाजी केली. १५७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना नेदरलँड्सने १८ षटकांत ३ गडी गमावून १५९ धावा करत सामना सहज जिंकला. बास डे लीडेने ४८ चेंडूंत ७२ धावांची तुफानी खेळी साकारत संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली. त्याच्या खेळीत ५ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. कॉलिन ॲकरमनने ३२ धावा जोडल्या, तर कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने नाबाद १८ धावा करत संघाला विजयरेषा पार करून दिली. या विजयासह नेदरलँड्सने गट 'अ' मधील आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. सामन्यातील अष्टपैलू कामगिरीसाठी बास डे लीडेला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. हा विजय नेदरलँड्ससाठी पुढील लढतींसाठी आत्मविश्वास वाढवणारा ठरला.

# ५० हजारांचा मोर्चा, ८ हजार हरकती तरीही बंदर प्रकल्पांना मंजुरीचा वेग

## कोकण संकटात किनारपट्टीवर उद्योगांचा 'ग्रीन सिग्नल', जनतेच्या संतापाला मात्र 'रेड लाईट'

**पालघर, रत्नागिरी । रयत समाचार**

महाराष्ट्रातील पर्यावरणीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांत तीन मोठ्या घडामोडींनी जनतेची चिंता अधिक तीव्र केली आहे. रत्नागिरीतील लोटे परशुराम येथील केमिकल उद्योग, तसेच पालघर जिल्ह्यातील वाढवण आणि मुरबे येथे प्रस्तावित बंदर प्रकल्पांना मिळालेली प्रशासकीय मान्यता ही किनारपट्टीवरील पर्यावरणीय भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. लोटे परशुराम प्रकरण : राज्यसभेत 'मानकानुसार उत्पादन' असा निर्वाळा रत्नागिरी जिल्ह्यातील लक्ष्मी ऑरगॅनिक, यल्लोस्टोन स्पेशालिटी केमिकल्स या उद्योगाबाबत राज्यसभेत केंद्र सरकारने लेखी उत्तर दिले आहे. खासदार प्रमोद तिवारी यांनी विचारलेल्या प्रश्नावर केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंग यांनी ता.५ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्तर देताना संबंधित उद्योग मानकांनुसार आणि नियमानुसार उत्पादन करत असल्याचे नमूद केले. या उद्योगाबाबत विशेष बाब म्हणजे, उत्पादनासाठी वापरण्यात आलेली यंत्रणा इटलीतील वादग्रस्त 'मितेनी' कंपनीकडून घेतल्याचा उल्लेखही चर्चेत आहे. मात्र प्रशासनाने उद्योगाला नियमबद्ध ठरविल्याने स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष अधिक वाढला आहे. वाढवण बंदरासाठी ८ लेन महामार्गाला MCZMA ची मान्यता : पालघर जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाला जोडण्यासाठी प्रस्तावित ८ लेन हायवे प्रकल्पाला महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी (MCZMA) ने मान्यता दिली आहे. किनारपट्टीवरील पर्यावरणीय संवेदनशील भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे होत असताना, या मंजुरीमुळे स्थानिक मच्छीमार, आदिवासी समाज आणि पर्यावरण अभ्यासकांनी चिंता व्यक्त केली आहे. मुरबे येथे प्रस्तावित जिंदाल (JSW) बंदरालाही मंजुरी : याच धर्तीवर पालघरच्या मुरबे परिसरात प्रस्तावित जिंदाल (JSW) बंदर प्रकल्पालाही MCZMA ने मान्यता दिली आहे. म्हणजेच हे प्रस्ताव आता अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे पाठविण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवर मात्र या प्रकल्पांना मोठा विरोध कायम आहे. जनतेचा प्रचंड विरोध : मोर्चे, जनसुनावणी आणि हजारो हरकती या बंदर प्रकल्पांविरोधात १९-२० जानेवारी २०२६ रोजी दोन वेगवेगळ्या मोर्चांमध्ये किमान ५०,००० नागरिक पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर जमा झाले होते तसेच, ६ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या मुरबे बंदराच्या पर्यावरणीय जनसुनावणीत १५ ते २० हजार नागरिकांनी विरोध नोंदवला आणि ८ हजारपेक्षा अधिक लेखी हरकती दाखल करण्यात आल्या होत्या. इतक्या व्यापक जनविरोधानंतरही प्रकल्पांना मंजुरी मिळणे हा लोकशाही प्रक्रियेवरील प्रश्न मानला जात आहे.



COASTAL DEVELOPMENT GETS GREEN SIGNAL, PUBLIC OUTCRY IGNORED

'प्रतिक्रिया देण्याची क्षमताही संपतेय'पर्यावरण कार्यकर्ते सत्यजीत चव्हाण यांनी व्यक्त केलेली भावना आज अनेक नागरिकांच्या मनातील अस्वस्थ वास्तव सांगते. लोटे परशुरामच्या विषारी उद्योगांबाबत असो किंवा पालघरच्या किनारपट्टीवरील बंदर प्रकल्पांबाबत, शासन- प्रशासन- उद्योगसत्ता यांना जनतेच्या असंतोषाचा फारसा परिणाम होत नसल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. पर्यावरणीय संघर्ष वाढत असताना, नागरिकांच्या आवाजाला किती स्थान दिले जाणार, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. किनारपट्टीवरील विकासाच्या नावाखाली पर्यावरण, स्थानिक उपजीविका आणि जनतेच्या सहभागाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना तीव्र होत आहे. प्रकल्प मंजुरीच्या प्रक्रियेत पारदर्शकता, स्थानिक जनतेचे मत आणि पर्यावरणीय परिणामांचा गंभीर विचार होणे ही काळाची गरज आहे.

# प्रसिद्धीपलीकडचा दीपस्तंभ : नाटककार दशरथ राणे



आजच्या सोशल मीडियाच्या जाहिरातबाजीच्या युगात झटपट प्रसिद्धी, सत्ता आणि आर्थिक स्थैर्य यांनाच यशाची मोजणी मानली जाते. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, सिद्धीच्या शिखरावर पोहोचूनही त्या झगमगाटाला न भुलता, मिळालेल्या समाधानातच जीवनाची खरी श्रीमंती शोधतात. समाजप्रबोधनाचे व्रत स्वीकारून, नाट्यलेखनाबरोबरच कामगार चळवळ, सहकार, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात साठ वर्षांहून अधिक काळ निस्वार्थपणे कार्य करणारे, मराठी रंगभूमीवरील सुप्रसिद्ध नाटककार दशरथ काशिराम राणे हे असेच एक मूल्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व. वयाच्या ८० व्या वर्षाकडे वाटचाल करत असताना, त्यांच्या जीवनकार्याचा सर्वांगीण वेध घेण्यासाठी साहित्यिक पत्रकार गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांनी त्यांच्याशी साधलेला हा आत्मीय आणि चिंतनशील संवाद आहे.

**प्रश्न : आपल्या बालपणापासून आजपर्यंतचा प्रवास कसा घडला ?**

दशरथ राणे : माझा जन्म ७ फेब्रुवारी १९४७ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मु. बोरथडे (ता. लांजा) येथे शेतकरी कुटुंबात झाला. ग्रामीण जीवनातील कष्ट, मातीशी असलेले नाते आणि माणसातील दुःख जवळून पाहणे मला बालपणातच शिकवले. या अनुभवांनी माझ्या लेखनाकडे वळण दिले आणि पात्रांच्या संघर्षाचे मूळ तयार झाले. प्राथमिक शिक्षण गावात झाले. उपजीविकेसाठी मुंबई गाठली. दिवसा मिळेल ते काम करत असतानाच सोशल नाईट हायस्कूल या रात्रशाळेत दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. रात्रशाळेने मला कष्टाची शिस्त, संयम आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची आत्मजाणीव दिली. गरिबीतून शिक्षण घेण्याचा हा संघर्ष माझ्या लेखनामध्ये पात्रांच्या संघर्षाचे मूलाधार बनला. माझ्या वैयक्तिक अनुभवामुळे मी नेहमीच समाजातील गरिबांना समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि ते माझ्या नाटकांमध्ये प्रतिबिंबित झाले.

**प्रश्न : लेखनाची सुरुवात कशी झाली ?**

दशरथ राणे : विद्यार्थीदशेत समाजातील प्रश्न मला अस्वस्थ करत होते. यातून वृत्तपत्रांत पत्रलेखन सुरू केले. ही पत्रे दैनिकांत प्रसिद्ध झाली आणि संबंधित खात्यांनी दखल घेत नागरिकांच्या समस्या सोडवल्या. या अनुभवातून मला ठाम जाणीव झाली की लेखन हे सामाजिक बदलाचे प्रभावी साधन ठरू शकते. ताडदेव सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या व्यासपीठावर माझा सत्कार झाला. तिथेच मला जाणवले की नाटककार म्हणून माझा सामाजिक दृष्टिकोन फक्त रंगभूमीतच नाही, तर प्रत्यक्ष जीवनातही परिणामकारक ठरतो. या काळात मला लेखनासाठी मान्यता मिळाल्यामुळे माझ्या सामाजिक दृष्टिकोनाची खरी ताकद लक्षात आली, आणि मी नाट्य आणि लेखन या माध्यमातून समाजप्रबोधनावर अधिक लक्ष केंद्रित केले.

**प्रश्न : नोकरी, चळवळ आणि लेखन यांचा समन्वय कसा साधला ?**

दशरथ राणे : १ फेब्रुवारी १९६६ साली पोस्ट खात्यात पोस्टमन म्हणून रुजू झालो. पुढे खात्याअंतर्गत परीक्षा उत्तीर्ण होऊन १ मार्च २००७ सहाय्यक पोस्टमास्तर म्हणून निवृत्त झालो. पोस्ट कामगारांच्या एन.एफ.पी.ई. संघटनेत सुरुवातीपासून सक्रिय राहिलो. २००७ साली सेवानिवृत्त होताना मी मुंबई दक्षिण विभागाचा अध्यक्ष होतो. कामगार चळवळीतील संघर्ष, अन्याय आणि एकजूट या गोष्टी माझ्या नाटकांच्या केंद्रस्थानी कायम राहिल्या. नोकरी ही उपजीविकेचे साधन होती, तर चळवळ आणि लेखन ही माझ्या आत्म्याची गरज होती, या तिन्हींचा समतोल राखण्याचा प्रयत्न मी प्रामाणिकपणे केला. पोस्टच्या कामामुळे मी विविध स्तरांवरील कामगारांचे जीवन अनुभवले, ज्यामुळे नाटकांमध्ये वास्तववादी पात्र निर्माण होऊ शकले.

**प्रश्न : नाट्यलेखनाची सुरुवात कशी झाली ?**

दशरथ राणे : १९६६ मध्ये घरमालकाचा घरजावई ही जागा टंचाईवर आधारित विनोदी एकांकिका लिहिली. विनोदाच्या माध्यमातून गंभीर सामाजिक प्रश्न मांडणे अधिक परिणामकारक ठरते, हे मला तेव्हाच जाणवले. नवाकाळ चे उपसंपादक दत्ताराम बारस्कर यांनी शालश्रीफळ देऊन प्रोत्साहन दिले; तो क्षण आजही प्रेरणादायी वाटतो. त्या प्रोत्साहनाने माझ्या आत्मविश्वासाला बळ मिळाले आणि रंगभूमीशी माझे नाते अधिक घट्ट झाले.

**प्रश्न : नाट्यप्रवासाचा विस्तार कसा झाला ?**

दशरथ राणे : उसन्या बायकोची, वरात लग्नाची या नाटकाने जिल्हास्तरापासून महाराष्ट्र राज्य हौशी नाट्यस्पर्धेपर्यंत प्रयोगांचा उच्चांक गाठला. अनेक ठिकाणी लेखन पारितोषिकांसह अनेक पारितोषिके मिळविण्याचा विक्रम केला. हौशी रंगभूमी ही समाजाच्या मुळाशी जोडलेली असल्याने मला ती नेहमीच जवळची वाटली. प्रेक्षकांशी थेट संवाद साधणारी ही रंगभूमी सामाजिक वास्तवाचे खरे प्रतिबिंब दाखवते आणि समाजप्रबोधनात नाटककाराची भूमिका अधोरेखित करते. वृत्तपत्रलेखन, कथा, कविता लेख, प्रस्तावना असे विविधांगी लेखन करताना नाटक, एकांकिका अशा विविध विषयांवर मिळून ७८ पुस्तके प्रकाशित केली. त्यापैकी काही नाटकांच्या १२ आवृत्याही हातोहात विकल्या गेल्या. १९७२ साली बडोद्याच्या त्रिमूर्ती संस्थेने मुधचंद्राने केला घोटाळा हे नाटक दिल्लीच्या महाराष्ट्र रंगायतनच्या नाट्य महोत्सवात सादर करुन पारितोषिक प्राप्त केले. याच नाटकाचे गुजराती भाषेतले प्रयोग विशेषत्वाने हाऊसफुल्ल ठरले. या दरम्यान १९९९ मध्ये प्रमोद नवलकर यांच्या हस्ते अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा उषा लोटलीकर स्मृती पुरस्कार प्राप्त झाला. हा पुरस्कार मिळाला म्हणून पोस्टातर्फे श्री.डी.एस. भालचंद्रन, मुख्य पोस्टमास्तर जनरल महाराष्ट्र सर्कल यांच्या हस्ते कौतुक सोहळा संपन्न झाला. निवृत्तीच्या वर्षी अर्थात २००७ मध्ये मा.आर.आर. पाटील यांच्या हस्ते त्रिदल प्रकाशनचे बापूसाहेब टिळक स्मृती पुरस्कार प्राप्त झाला. हा पुरस्कार मिळाला म्हणून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातून शाहीर साबळे व स्मिता तळवलकर यांच्या हस्ते कौतुक सोहळा संपन्न झाला. तर नाट्यलेखन कारकिर्दीला ५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ग्रामस्थांनी खासदार विनायक राऊत यांच्या हस्ते सत्कार केला.

**प्रश्न : बहुभाषिक प्रयोगांचा अनुभव कसा होता ?**

दशरथ राणे : माझ्या नाटकांचे मराठीबरोबर हिंदी, गुजराती आणि कन्नड भाषांत प्रयोग झाले. भाषा बदलली तरी माणसाच्या भावना आणि सामाजिक प्रश्न सारखेच असतात, हे या प्रवासात प्रकर्षाने जाणवले. या अनुभवामुळे साहित्याची सार्वत्रिकता आणि मानवी संवेदनांची एकसूत्रता अधिक ठळकपणे समोर आली.


**प्रश्न : आजच्या नव्या पिढीबद्दल आपले निरीक्षण काय ?**

दशरथ राणे : नव्या पिढीत ऊर्जा आणि बुद्धिमत्ता आहे; मात्र संयम आणि सातत्य कमी होत चालले आहे. सल्लागार म्हणून काम करताना हे वारंवार जाणवते. जर ही पिढी मूल्यनिष्ठा, चिकाटी आणि सांस्कृतिक संवेदनशीलता जपेल, तर भविष्यातील नेतृत्व त्यांच्या हाती सुरक्षित राहील. नव्या पिढीला मार्गदर्शन देणे हे माझे सामाजिक कर्तव्य आहे.

**प्रश्न : आयुष्याच्या या टप्प्यावर मागे वळून पाहताना काय वाटते ?**

दशरथ राणे : न मिळालेल्या गोष्टींची खंत नाही. मिळालेल्या अनुभवांनी मला समृद्ध केले आहे. आजही लेखन सुरू आहे आणि नवोदितांना मार्गदर्शन करता येते, याहून मोठे समाधान नाही. आयुष्याची संध्याकाळही सर्जनशीलतेने उजळू शकते आणि नवोदितांसाठी ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करणे हे माझे कर्तव्य आहे.

साठ वर्षांहून अधिक काळ नाट्यलेखन, कामगार चळवळ, सहकार तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत राहूनही प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर राहिलेला हा रंगकर्मी आजही तितक्याच शांततेने आपले कर्तव्य बजावत आहे. ८० व्या वर्षाकडे वाटचाल करत असतानाही लेखनाची ज्योत अखंड तेवत ठेवणारे दशरथ राणे हे केवळ नाटककार नसून, मूल्याधिष्ठित जीवनाचा चालता-बोलता इतिहास आहेत. त्यांनी आपल्या कार्यातून समाजातले बदल, नवोदितांचे मार्गदर्शन, बहुभाषिक सर्जनशीलता आणि पुरस्कारांचा गौरव यांचे अनमोल ठसे सोडले आहेत. खरे यश गाजण्यात नसून समाजमनावर उमटलेल्या, दीर्घकाळ टिकणाऱ्या ठशात दडलेले असते, आणि ही मुलाखत त्या ठशांचे साक्षीदार ठरते. वाचकाला अंतर्मुख करणारा दीपस्तंभ म्हणून उभी राहते.



गुरुदत्त वाकदेकर
९९८७७४६७७६

कलादर्पण